Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18850478

# समकालीन समाजातील बदल आणि महिला: आव्हाने व संधी

जया रमेश दाभाडे[1] & प्रा. डॉ. संजय जी. कांबळे[2]

**सारांश :**

“समकालीन समाजातील बदल आणि महिला: आव्हाने व संधी” हा विषय आधुनिक सामाजिक, आर्थिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक परिवर्तनांच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या स्थितीचा सखोल अभ्यास मांडतो. जागतिकीकरण, शहरीकरण, डिजिटल क्रांती आणि शिक्षणाचा प्रसार यांसारख्या घटकांनी समाजरचनेत लक्षणीय बदल घडवून आणले आहेत. United Nations आणि World Economic Forum यांच्या अहवालांनुसार, लिंगसमतेकडे सकारात्मक पावले उचलली जात असली तरी सामाजिक विषमता, लैंगिक भेदभाव, वेतनातील दरी, कौटुंबिक हिंसा आणि सुरक्षिततेचे प्रश्न अजूनही गंभीर स्वरूपात अस्तित्वात आहेत.

समकालीन काळात महिलांनी शिक्षण, राजकारण, उद्योग, विज्ञान-तंत्रज्ञान आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. डिजिटल माध्यमे आणि उद्योजकतेच्या नव्या संधींमुळे महिलांना स्वावलंबनाचे नवे मार्ग खुले झाले आहेत. तरीही पारंपरिक रूढी, पितृसत्ताक मानसिकता आणि सामाजिक अपेक्षा यांमुळे महिलांसमोर विविध मानसिक, आर्थिक आणि सामाजिक आव्हाने उभी राहतात.

या संशोधनाचा उद्देश समकालीन बदलांचा महिलांच्या जीवनावर होणारा परिणाम विश्लेषित करणे, त्यातील प्रमुख आव्हाने ओळखणे आणि उपलब्ध संधींचा अभ्यास करणे हा आहे. लिंगसमता, सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय यांची अंमलबजावणी प्रभावी धोरणे, शिक्षणाचा प्रसार आणि जागरूकतेच्या माध्यमातून कशी साध्य करता येईल, यावरही या अभ्यासात भर देण्यात येतो. अशा प्रकारे, हा विषय समकालीन समाजातील परिवर्तनाच्या प्रक्रियेत महिलांची भूमिका आणि भविष्यातील दिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो.

**प्रस्तावना :-**

समकालीन समाजात सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदल वेगाने होत आहेत. जागतिकीकरण व तंत्रज्ञानामुळे समाज रचना बदलताना दिसत आहे. या बदलाचा महिलांच्या जीवनावर मोठा परिणाम दिसून येतो. पूर्वी महिलाची स्थिती चूल आणि मुल इतक्याच जबाबदाऱ्यापुरती मर्यादित होती परंतु महिलांनी

[1] संशोधक, संशोधन केंद्र : विवेकानंद कला, सरदार दलिपसिंह वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
[2] मार्गदर्शक, प्राध्यापक व विभागप्रमुख, लोकप्रशासन विभाग, राजर्षी शाहू कला व विज्ञान महाविद्यालय, वाळूज, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

आपल्या सहनशीलता व चिकाटीच्या बळावर शिक्षणाच्या माध्यमातून राजकारण, शिक्षण, उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रात प्रगती केली आहे.

महिला आपल्या हक्कासाठी स्वातंत्र्यासाठी आणि स्वतःवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढू शकते कारण ती मानसिक दृष्ट्या सक्षम झाली आहे. या सकारात्मक बदलाबरोबरच महिलांना पुरुषप्रधान मानसिकतेमुळे लिंगभेद, कामाच्या ठिकाणी भेदभाव, कौटुंबिक जबाबदारी व नोकरी, मानसिक, शारिरीक छळ या सारख्या आव्हानांना सामोर जावे लागत आहे. २१ व्या शतकात दुसऱ्या देशाने महिलांना दिलेला दर्जा व त्यामुळे त्या देशाची झालेली प्रगती डोळ्यासमोर असताना देखील भारतात बऱ्याच ठिकाणी महिला व पुरुषांचे असमान गुणोत्तर आढळते.

महिलांच्या विकासासाठी, संरक्षणा-साठी कठोर कायदे व योजना बनल्या आहेत. परंतु कायदे करून समस्या दूर होणार नाही. त्यासाठी समाजामध्ये महिलांबद्दल सन्मान, आदराची भावना निर्माण करणे व त्या दृष्टीने समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणणे काळाची गरज आहे.

**उद्दिष्ट्ये**

१) समकालीन समाजातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक बदलांचा महिलांच्या जीवनावर होणारा परिणाम जाणून घेणे.

२) समकालीन समाजात महिलांसाठी निर्माण झालेल्या संधीचा अभ्यास करणे.

३) महिलांसमोर येणाऱ्या सामाजिक व आर्थिक आव्हानांचा अभ्यास करणे.

४) महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षण, तंत्रज्ञान, व सरकारी धोरणाची भूमिका तपासणे, समजणे.

**गृहितके :-**

१) समाजातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक बदलांचा महिलांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम होत आहे.

२) तंत्रज्ञान व डिजिटल माध्यमांच्या वापरामुळे महिलांच्या सक्षमीकरणावर लक्षणीय परिणाम होत आहे.

३) समकालीन समाजात लिंगभेद आणि सामाजिक असमानतेचे प्रमाण कमी झाले आहे.

४) शिक्षणासाठी मिळालेल्या संधीमुळे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

समकालीन समाजातील बदल आणि महिला :-

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18850478

भारतातील समकालीन समाजात महिलांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्योत्तर स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केले गेले. त्यामुळेच वर्तमान परिस्थितीत स्त्रियांची स्थिती परंपरागत समाजापेक्षा अधिक चांगली आहे. महिला या पुरुषप्रधान समाजाच्या प्रभावातून मुक्त होऊन सामाजिक, आर्थिक, राजकीय शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. महिलांच्या सक्षमीकरणात बदल होण्यामागे अनेक कारणे आहेत त्यापैकी एक म्हणजे डिजिटल तंत्रज्ञान हे होय. यामुळे महिला सक्षमीकरणात लक्षणीय बदल झालेला दिसून येतो. डिजिटल तंत्रज्ञानामुळे म्हणजेच मोबाईल ॲप, इंटरनेट यांच्या वापरामुळे महिला सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्तरावर सक्षम होत आहेत. तंत्रज्ञानामुळे महिला साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत आहे उच्च शिक्षणातही महिलांचा सहभाग वाढत चाललेला आहे. शिक्षणाच्या माध्यमातून महिलांनी स्वत:च्या अस्तित्वाची निर्मिती करून आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास केला आहे. डिजिटल तंत्रज्ञानामुळे महिला ऑनलाईन व्यवसाय सुरू करून व्यवसाय क्षेत्रात आपली ओळख बनवून आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर व स्वावलंबी बनल्या आहेत. डिजिटल उपकरणामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न काही प्रमाणात सुटला आहे या उपकरणामुळे सरकारी धोरणे, कायदे आणि समान संधी सुनिश्चित केली जात आहे. ग्रामीण भागात महिला पर्यंत आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान पोहोचविण्यासाढी अनेक स्वयंसेवी संस्था शासनास मदत करत असतात. आज तांत्रिक साधनाच्या सहाय्याने महिला कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय आव्हाने मोठ्या कुशलतेने पार पाडत आहेत.

**विविध क्षेत्रामध्ये महिलांना असलेल्या संधी :-**

समकालीन समाजातील महिला ही कार्यक्षम, सामाजिक जाणीव असलेली जबाबदार आणि आत्मनिर्भर बनलेली आहे. चुल व मुल इतकेच तिचे कार्यक्षेत्र न राहता घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडून नोकरी व कुटुंबातील दोन्ही जबाबदाऱ्या ती पार पाडत आहे. आज महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनण्यासाठी शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार व राजकीय सहभागाच्या विविध संधी उपलब्ध होत आहे. महिला सक्षमीकरणामुळे महिलांना पुरुषाच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध होत आहे.

तंत्रज्ञान व बदलत्या सामाजिक दृष्टीकोनामुळे महिला प्रत्येक क्षेत्रात आपले नेतृत्व सिद्ध करत आहेत. डिजिटल व तंत्रज्ञानामुळे महिलांना घर बसल्या काम करण्याची संधी निर्माण झाली आहे. या संदर्भात महिलांसाठी डिजिटल उद्योजक म्हणून घडविण्यासाठी महाराष्ट्रात विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जात आहेत. ग्रामीण भागातील महिलांपर्यंत आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था शासनास मदत करतात. स्वयंसेवी संस्था महिलांना विविध क्षेत्रात साहय करतात. विकासाच्या प्रत्येक क्षेत्राची आवश्यक माहिती महिलांना उपलब्ध झाली आहे व ज्ञान व कौशल्य वाढविण्याची संधी त्यांना मिळाली आहे.

भारतीय राज्यघटनेनुसार भारतीय समाजातील प्रत्येक नागरिकास सर्वांना समान अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. परंतु वैधानिक दृष्टीने स्त्री-पुरुष समानतेचे तत्व मान्य केले असले, तरी प्रत्यक्षात काही ठिकाणी आजही स्त्री-पुरुष असमानता दिसून येते. म्हणून कायद्याद्वारे महिला सक्षमीकरण साधण्यासाठी

शासनाने विविध कायदे अमलात आणले आहे. त्याच बरोबर महिलांच्या विकासासाठी भरपूर योजना देखील राबविण्यात आल्या आहेत. या योजनामुळे महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम बनून त्यांचा आत्मविश्वास व निर्णयक्षमता वाढली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, महिला समृद्धी योजना, मुद्रा योजना अशा अनेक आर्थिक योजनांमुळे महिला आत्मनिर्भर होत आहेत. या योजनांची व कायद्याची अंमलबजावणी प्रभावी झाल्यास महिलांचा प्रभावी विकास व प्रगती होईल.

**महिलांसमोरील आव्हाने**

आपल्या समाजातील महिलांचा एक मोठा वर्ग अजूनही सामाजिक बंधनाचे बंधन पूर्णपणे तोडू शकलेला नाही. विकासाच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या भारतात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक पातळीवर महिला कितीही पुढे आल्या असल्या तरी महिलांना आजही अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. शिक्षण, आरोग्य, घरगुती जीवन, राजकीय नेतृत्व, सामाजिक ठिकाणी आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षितता यासारख्या विविध आव्हानांना तोंड देत असल्याने आज समाजात महिलांचे स्थान अनिश्चित आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी काही बाबतीत स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. पुरुषप्रधान मानसिकता बदलली नसल्याने स्त्रियांवरील अन्याय अद्यापही दूर होऊ शकले नाहीत.

आज समानतेच्या वागणुकीपासून स्त्री अजूनही वंचित राहिलेली असल्याची उदाहरणे प्रत्येक क्षेत्रामध्ये जागोजागी दिसू लागली आहेत. बाहेर नोकरी करणाऱ्या महिलांना घरातील सर्व कामे करून नोकरी करावी लागते अशी दुहेरी जबाबदारी पूर्ण करावी लागते. इतके करूनही सासरच्या लोकांकडून हुंड्यासाठी मारहाण आणि महिलांना संपत्तीत समान वाटा न मिळणे, ही महिलांसमोर मोठी आव्हाने आहेत. महिलांसमोरील ही आव्हाने ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. सुशिक्षित कुटुंबात ही पितृसत्ताक मानसिका आजही दिसून येते. या सर्व आव्हानांचा महिलांच्या शारीरिक, मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होत आहे. महिलांच्या जिवनात येणाऱ्या अशा समस्यांवर सामाजिक व शासकीय दृष्टीने विचार करून उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी केली तर या समस्यांवर पायबंद घालण्यास मदत होईल.

**निष्कर्ष :-**

समकालीन समाजात झालेल्या बदलामुळे महिलांसाठी अनेक संधी उपलब्ध झाल्या आहे. त्यामुळे महिला आत्मनिर्भर व स्वावलंबी बनत असली तरी त्यांच्या जीवनातील पारंपरिक रूढी, पितृसत्ताक मानसिकता आणि सामाजिक अपेक्षा यामुळे त्यांच्या जीवनातील आव्हाने आजही पूर्णपणे संपलेली नाहीत. महिला सक्षमीकरणात मानसिक बदल प्रभावी होण्यासाठी फक्त कायद्याची निर्मिती पुरेशी नाही, तर त्यासाठी त्यांची अंमलबजावणी देखील प्रभावी झाली पाहिजे.

**समारोप :-**

महिला या कौटुंबिक जबाबदाऱ्या पुरत्या मर्यादित न राहता राष्ट्राच्या विकासाला पाठिंबा देत आहेत. महिलांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात आपले नेतृत्व सिद्ध केले आहे. महिलांना त्यांच्या प्रगतीत केवळ संधीच मिळाली नाही तर आव्हानांचा सामना देखील करावा लागत आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांच्या स्थितीत जास्त काही फरक झालेला दिसून येत नाही. महिला समोरील भेडसावणाऱ्या आव्हानांना पूर्ण पणे नष्ट करावयाचे असेल तर महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे आणि कायदे कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. या संशोधनातून एक गोष्ट स्पष्ट होते की, समकालीन समाज वेगाने बदलत आहे आणि या बदलांच्या केंद्रस्थानी महिला आहेत. विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती, शिक्षणाचा विस्तार, जागतिकीकरण, डिजिटल माध्यमांचा प्रभाव आणि बदलती सामाजिक मूल्ये यामुळे महिलांच्या आयुष्यात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्या आहेत. परंतु त्याचवेळी काही गंभीर आव्हानेही समोर उभी आहेत. तथापि, लिंगभेद, कौटुंबिक हिंसा, वेतनातील असमानता, काम-जीवन समतोलाचा ताण, सुरक्षिततेचे प्रश्न आणि सामाजिक पूर्वग्रह ही आव्हाने अजूनही पूर्णपणे नाहीशी झालेली नाहीत. डिजिटल युगात सायबर गुन्हे आणि ऑनलाइन छळ यांसारखी नवी आव्हानेही महिलांसमोर उभी राहिली आहेत. या पार्श्वभूमीवर समाजाने केवळ कायदे बनवून न थांबता मानसिकता बदलणे आवश्यक आहे. कुटुंब, शाळा, समाज आणि शासन यांनी एकत्रितपणे महिलांना समान संधी, सुरक्षित वातावरण आणि सन्मानाची वागणूक दिली पाहिजे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ महिलांची लढाई नसून ती संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे.

**संदर्भ**

१) प्रियंका पवार, (२०२४), “महिलांच्या विकासात महिला व बालविकास विभागाच्या योजना”, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद

२) एकनाथ मालोजी भोसले, (२०२२), महिला आरोग्यं योजना”, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद

३) प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोडबिल, आनंद लाड, सुगावा प्रकाशन पुणे, (२०१०)

४) वंदना महाजन, (२०१३), स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन, अथर्व प्रकाशन, जळगाव

**Publisher’s Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*